**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
केंद्रीय कापूस संशोधन संस्था
नागपूर

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 15-06-2021**

**नागपूर(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2021-06-15 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2021-06-16 | 2021-06-17 | 2021-06-18 | 2021-06-19 | 2021-06-20 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 14.7 | 12.6 | 18.1 | 26.6 | 34.8 |
| कमाल तापमान (अं.से) | 36.4 | 35.7 | 35.9 | 35.1 | 35.2 |
| किमान तापमान (अं.से) | 23.8 | 23.3 | 22.8 | 22.0 | 21.5 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 79 | 75 | 80 | 77 | 82 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 59 | 53 | 60 | 57 | 60 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 13.0 | 14.0 | 16.0 | 15.0 | 15.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 253 | 271 | 278 | 282 | 280 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 7 | 7 | 7 | 7 | 7 |

## हवामान सारांश / चेतावणी :

नागपूर जिल्ह्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या अंदाजानुसार, दिनांक १६ जून २०२१ ते २० जून २०२१ दरम्यान पूर्णतः ढगाळ राहण्याची तसेच दिनांक १६ जून रोजी बऱ्याच ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस व तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, १७ जून रोजी बऱ्याच ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस, १८ जून रोजी बऱ्याच ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस व तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, १९ जून रोजी सर्वत्र ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस व तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह (३० ते ४० किमी/तास) मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, दिनांक २० जून रोजी सर्वत्र ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस व तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस, वादळी वाऱ्यासह (३० ते ४० किमी/तास), मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. दीर्घ मुदतीच्या अंदाजानुसार, दिनांक २४ जून २०२१ पर्यंत सरासरी पेक्षा जास्त पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

भाजीपाला, फळबागा तसेच इतर पिकामध्ये पाणी साचून राहणार नाही यासाठी शक्य असलेल्या उपाययोजना कराव्यात.नदी किंवा नाल्याच्या आसपास राहणाऱ्या शेतकऱ्यांनी पाणी वाहत असताना नदी नाले ओलांडू नये, शेतातील कामे काळजीपूर्वक करावीत व शक्य असल्यास घरीच थांबावे.(https://maharain.maharashtra.gov.in/) संकेतस्थळावरील माहितीनुसार जिल्ह्यातील कोराडी (कामठी), नगरधन, रामटेक, मुसेवाडी (रामटेक), अमाडी, पारशिवनी, कन्हान (पारशिवनी), खात, धानला, कोदामेंडी (मौदा), येनवा, मेटापांजरा, रिधोरा (काटोल), मोवाड (नरखेड), सावनेर, पाटणसावंगी (सावनेर), मोहपा (कळमेश्वर), उमरेड (उमरेड), मालेवाडा, भिवापूर (भिवापूर), राजोळी (कुही) मंडळामध्ये पेरणीयोग्य पाऊस झाला नसल्याने शेतकरी बांधवांनी पेरणीयोग्य ८० ते १०० मिमी पाऊस, जमिनीमध्ये पेरणीयोग्य पुरेसा ओलावा आणि वाफसा आल्यानंतरच पेरणी करावी. ज्याठिकाणी पेरणीयोग्य ८० ते १०० मिमी पाऊस, जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असल्याची खात्री आणि वाफसा परिस्थिती आल्यानंतर पेरणी करावी.

## संक्षिप्त संदेश सल्ला :

शेतकरी बांधवांनी पेरणीपुर्वी बियाण्यास बुरशीनाशक आणि जीवाणू खताची बीजप्रक्रिया करावी.

**पिक निहाय सल्ला :**

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कॉटन | पेरणीकरिता कपाशीच्या कमी ते मध्यम कालावधीच्या रस शोषक किडीला सहनशील बीटी/नॉन बीटी वाण/संकरीत वाणाची वाणाची निवड करावी. पेरणीपूर्वी बियाण्यास कार्बोक्सीन ३७.५ % + थायरम ३७.५ % डीएस या पुर्वमिश्रीत बुरशीनाशकाची ३ ग्राम प्रती किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी. नत्र स्थिरीकरणासाठी अॅकझोटोबॅक्टरआणि स्फुरद विरघळविणारे जीवाणू (पीएसबी)या जीवाणूसंवर्धकाची २० ते २५ ग्राम प्रती किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी. कपाशी मध्ये मुग आणि उडीद (१: १) ओळ या आंतरपिकाचा अवलंब करावा. तणाच्या व्यवस्थापनासाठी कपाशी उगवणी पूर्वी पेंडामिथिलीन ३८.७ % सीएस १.५ ते १.७५ सक्रीय घटक प्रती हेक्टर (२० ते २५ मिली प्रती लिटर पाणी) या प्रमाणात फवारणी करावी. |
| कॉटन | कपाशीमध्ये शिफारशीत असणारे अंतर आणि रासायनिक खताचा अवलंब करावा. देशी वाणाची लागवड (ओळ व झाडातील अंतर) ६० x १५ किंवा ६० x ३० सेंमी आणि ४० किलो नत्र, २० किलो स्फुरद व २० किलो पालाश प्रती हेक्टरखताची मात्रा द्यावी. सुधारित वाणासाठी (ओळ व झाडातील अंतर) ६० x ३० सेंमी आणि ६० किलो नत्र, ३० किलो स्फुरद व ३० किलो पालाश प्रती हेक्टर खताची मात्रा द्यावी. कोरडवाहू बीटी संकरीत वाणासाठी (ओळ व झाडातील अंतर) ९० x ४५ किंवा ९० x ६० सेंमी आणि ६० किलो नत्र, ३० किलो स्फुरद व ३० किलो पालाश प्रती हेक्टर खताची मात्रा द्यावी.बागायती बीटी कपाशी वाणासाठी (ओळ व झाडातील अंतर) १२० x ३० किंवा १२० x ६० सेंमी आणि १२० किलो नत्र, ६० किलो स्फुरद व ६० किलो पालाश प्रती हेक्टर खताची मात्रा द्यावी. |
| कॉटन | शाश्वत उत्पादनासाठी आंतरपीक पद्धतीमध्ये उदा., कापूस + मुग (१: २) किंवा कापूस + उडीद (१: १) किंवा कापूस + सोयाबीन (१: १) किंवा कापूस + तूर (६:१ किंवा ८-१०:२) अवलंब करा. उगवणीनंतर तणनाशक पायरीथिओबॅक सोडियम @ ६२.५ ग्राम सक्रीय घटक/हेक्टर + क्विझाल्फोपेथिल ५० ग्रॅम सक्रीय घटक मिसळून २०-३० दिवसानंतर तन २-४ पानाच्या अवस्थेत असताना फवारणी करावी. |
| हिरव्या ग्रॅम | मूग पिकाच्या लागवडीकरिता पिकेव्ही मूग-८८०२, पिकेव्ही ग्रीनगोल्ड (एकेएम ९९११) या वाणाची निवड करावी, प्रती हेक्टरी १२-१५ किलो बियाणे, दोन ओळीतील अंतर ३०/४५ सेंमी आणि दोन झाडामधील अंतर १० सेंमी ठेवावे. पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया, खते तसेच जीवाणू संवर्धनाचा वापर करावा. |
| चणा डाळ | उडीद पिकाच्या लागवडीकरिता टीएयु-१, टीएयु-२, पिकेव्ही उडीद-१५ आणि पिकेव्ही ब्लॅकगोल्ड या वाणाची निवड करावी, प्रती हेक्टरी १२-१५ किलो बियाणे, दोन ओळीतील अंतर ३०/४५ सेंमी आणि दोन झाडामधील अंतर १० सेंमी ठेवावे. पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया, खते तसेच जीवाणू संवर्धनाचा वापर करावा. |
| पिगॉन पीईए (रेड ग्रॅम / अहर) | तूर पिकाचे चांगल्या प्रतीचे बियाणे अधिकृत विक्रेत्याकडून/प्रमाणित बियाणे धारकाकडूनच करावी. तूर बियाण्याला बीज प्रक्रियेसाठी रायझोबियम किंवा स्फुरद विरघळविणारे खते (पीएसबी) {२५० ग्राम प्रती १० किलो बियाणे} यांचा वापर करावा. तूर पिकाचे शिफारस केलेले वाण- एकेटी-८८११, पीकेव्ही-तारा, बीएसएमआर-८५३, बीएसएमआर-७३६ आणि आयसीपीएल-८७११९ (आशा). |
| सोयाबीन | दोन ओळीतील व रोपट्यातील अंतर ३० X ८ किंवा ४५ X ५ सेंमी ठेवावे तसेच उताराला आडवी व पूर्व पश्चिम दिशेला पेरणी करावी. पेरणीकरिता जे.एस. ३३५, जे.एस.९३०५, एम.ए.यू.एस. -७१, एम.ए.यू.एस. -१५८, एम.ए.यू.एस. -१६२, जे.एस.-२०-२९, जे.एस.-२०-३४, ए.एम.एस. – १००१ (पीडिकेव्ही येलो गोल्ड), ए.एम.एस.-एम.बी.-५-१८ या शिफारशीत वाणाचा वापर करावा. |
| सिट्रस | लिंबूवर्गीय फळबाग लागवडीसाठी तयार केलेल्या प्रत्येक खड्ड्यांमध्ये २ भाग जमिचीच्या पृष्ठभागावरील माती, १भाग वाळू आणि १ भाग चांगले कुजलेले शेणखत मिश्र करून भरून घ्यावेत, त्याचबरोबर, प्रत्येक खड्ड्यात 1 किलो सिंगल सुपर फॉस्फेट, १किलो निंबोळी केक आणि १००ग्रॅम क्लोरपायरीफॉस पावडर टाकावी. |
| सिट्रस | पुढील पाच दिवस जिल्ह्यात पाऊस होण्याची शक्यता असल्याने संत्रावर्गीय फळबागा मध्ये पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी उताराच्या दिशेने व दोन ओळीनंतर ३० सेंमी खोल, ३० सेंमी खालची रुंदी व ४५ सेंमी वरची रुंदी या आकाराचे चर खोदावेत. झाडाच्या बुंध्याजवळ पाणी साचून राहू नये म्हणून आळे व दांड सपाट करून घ्यावेत. |

**पशुधन विषयक निहाय सल्ला :**

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| बकरा किंवा बकरी | शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. जनावरांचे उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी जनावरांना शेड किंवा गोठ्यात ठेवावे. |

**इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला :**

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | शेतकरी बांधवांनी बियाणे खरेदी करताना टॅग/लेबल वरील संपूर्ण माहिती जसे कि, पिकाचे नाव, वाण/जात, उगवणशक्ती, भौतिक व अनुवांशिक शुद्धता टक्केवारी, निव्वळ वजन, बियाणे चाचणी, तारीख, महिना व वर्ष, बीज प्रक्रियेला वापरलेले रसायन, तसेच विक्रेत्याचे नाव व पत्ता इत्यादि माहिती तपासून घ्यावी. बियाणे विक्रेत्याकडून खरेदी केलेल्या बियाण्याची पक्की पावती/बिल घ्यावे, त्यावर विक्रेता आणि खरेदी करणारे शेतकरी यांची स्वाक्षरी असल्याची खात्री करावी. |
| सामान्य सल्ला | आंतर पिके: कोरडवाहुत सलग पिकाऐवजी खालील आंतर पिके घ्यावीत. कपाशी + ज्वारी + तूर + ज्वारी (३:१:१:१ ओळी) /कपाशी + सोयाबीन + तूर + सोयाबीन (३:२:२:२ ओळी) /सोयाबीन + तूर (४:२ किंवा ६:२ किंवा ५:१ ओळी) / तूर + मुग किंवा उडीद (२:४ ओळी) / ज्वारी + मुग किंवा उडीद (३:३ ओळी) /कपाशी + मुग किंवा उडीद (१:१ ओळी) . |
| सामान्य सल्ला | शेतकरीबांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: जर तुम्हीशेतात काम करीत असाल तर शेताजवळील ताबडतोब आश्रय घ्यावा. शेतातील सुरक्षितठिकाणाचा आसरा घेतल्यानंतर पायाखाली कोरडे लाकूड, प्लास्टिक, गोणपाट, कोरडापालापाचोळा ठेवावा. तुमचे दोन्ही पाय एकत्र करून गुडघ्यावर दोन्ही हात ठेवूनतळपायावर बसावे. तुमच्या पायाव्यतिरिक्त शरीराचा अन्य कुठलाही भाग जमिनीलास्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी. जमिनिमध्ये ओलावा असलेल्या ठिकाणीकिंवा पाण्याच्या स्त्रोतामध्ये जसे कि, तलावात काम करणाऱ्या व्यक्तींनी ताबडतोब सुरक्षित आणि कोरड्या ठिकाणी जावे.जवळपास उंच झाडे असतील तर त्या झाडाच्या उंचीपेक्षा दुप्पट उंचीच्या अंतरावरआश्रय घ्यावा. |
| सामान्य सल्ला | शेतकरीबांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: विजांच्याबचावापासून पक्के घर हे सर्वात सुरक्षित ठिकाण आहे. शेतकऱ्यांनी आपले घर तसेचजनावरांचा गोठ्याच्या आजूबाजूला शक्यतो कमी उंचीची झाडे लावावीत. ओलावा असलेले, दलदलीचे ठिकाण तथा पाण्याचे स्तोत्र (विहीर, तलाव, नदी, शेत तालाव ई.) पासूनशक्यतो दूर राहावे. चारचाकी वाहनातून प्रवास करीत असल्यास वाहनातच थांबावे.शेतकरी बांधवांनी त्यांच्याजवळ धातूचे कुठलेही उपकरण नसावे याची दक्षता घ्यावी.शेतामध्ये काम करतांना एकाच वेळी जास्त व्यक्तींनी एकत्र काम करू नये. दोनव्यक्तीमध्ये किमान १५-२० फूट अंतर राहील याची काळजी घ्यावी. धातूची दांडीअसलेल्या छत्रीचा वापर करू नका. शेतकऱ्यांनी विजेवर चालणारी तसेच धातू पासूनबनलेल्या इतर कृषी अवजारांपासून दूर रहा. |